|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet Containing Periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

## आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष १४ वे, अंक ४ था * दि. १५ डिसेंबर २०१४ * किंमत रु. २०/-



ठाणे येथील वार्षिक सभा व संमेलनाच्या यशस्वीतेसाठी
अथक परिश्रम घेणारी ठाणेकर कुलबंधु-भगिनींची टीम



# देवधर मंडळ - कार्यकारिणी (१/४/२०१३ ते ३१/३/२०१६)

**अध्यक्ष**
पुरुषोत्तम गोपाळ देवधर (कु. वृ. पान. ३६०)
ब्लॉक नं. २, भागीरथी टॉवर्स, स.नं. ६, हि. नं. ११,
कोकण एक्सप्रेस, हॉटेल लेन, कोथरुड पुणे-४११०३८
दूरध्वनी- ९८६०३०६३४४, ०२०/२५४५६७५०
e-mail : pgdeodhar@gmail.com

**उपाध्यक्ष**
वासुदेव नारायण देवधर (कु. वृ. पान. ४९७)
सी-३/१०२, सॅटेलाईट क्लासिक, जुने सी. एस. सी. कंपाऊंड,
गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०००६०
दूरध्वनी २८२६१०२८,२८२४६०४२

सुरेश विश्वनाथ देवधर (कु. वृ. पान. २१)
१०२, आय् विंग, प्रणयनगर, राम मंदिर रोड (विस्तारित)
बाभई, बोरीवली (प.), मुंबई-४०००९१
दूरध्वनी : ०२२/२८९८१८५६
e-mail : suresh.deodhar@gmail.com

**कार्यवाह**
सौ. सरिता मुकुंद देवधर (कु.वृ.पान ३५९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगावकर बिल्डिंग नं. ६,
गिरगाव, मुंबई-४००००४ दूरध्वनी ०२२/२३८५४८११

**सहकार्यवाह**
विजय गंगाधर देवधर
(पुणे विभाग कार्यवाह)
गौरी शंकर, १४ गोवर्धन सोसायटी,वीर सावरकर नगर,
पुणे-४११०३७. दूरध्वनी :०२०-२४२६४३२, ८३०८८०५८९५
e-mail : deodharvg@yahoo.co.in

**कोषाध्यक्ष**
अकल्पिता चिंतामणी देवधर (कु. वृ. पान. ८९८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गांवदेवी चौक, कल्याण
मोबाइल : ९८२०३५६४१३
e-mail : cdakalpita@yahoo.co.in

**सहकोषाध्यक्ष (स्वीकृत)**
नितेश नारायण देवधर (कु. वृ. पान. ४७३)
फ्लॅट नं. १२, भारत सावली अपार्ट.२ रा मजला, कल्पतरु टॉवर
समोर, सखाराम कॉम्प्लेक्स, डोंबिवली (प.)
मोबाइल : ९००४१९८९०३
e-mail : nitesh.devdhar@gmail.com

**वाटचाल (स्वीकृत)**
आशिष राम देवधर (कु. वृ. पान. ३१)
अतिथी संपादक, वाटचाल
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका,
कल्याण (प.) ४२१३०१ दूरध्वनी : ०९८३३५११५९३
e-mail : ashish.ram.deodhar@gmail.com

**सभासद**
मधुसूदन दत्तात्रेय देवधर (कु.वृ.पान ५३१)
११५२,'राधाकृष्ण' सुभाष नगर, १ ली गल्ली, शुक्रवार पेठ,
पुणे-४११००२, दूरध्वनी ०२०-२४४७८१६०

हेमंत यशवंत देवधर (कु. वृ. पान. ३१७)
श्री. विवेकानंद को. ऑप. हौ. सोसा., बिल्डिंग नं. १६, ब्लॉक नं.
२, तळमजला, गुरुमंदिरासमोर, सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू.)
मोबाइल : ९८३३००७०६४
e-mail : hemant3232@rediffmail.com

नरेश कृष्णाजी दीक्षित (कु. वृ. पान. ७२५)
ब ९, ॐ भैरवी सोसा., सम्राट हॉटेल बिल्डिंग,
पं. दीनदयाल मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२
फोन : ०२५१- २४८८७३६ मोबाईल : ९८२०४६७७४२
e-mail : nareshdixit1949@gmail.com

डॉ. सुनिल गोपाळ देवधर (कु. वृ. पान. ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर,
नाशिक रोड, नाशिक ४२२१०१. फोन : (०२५३)२४६४७८०
मोबाईल : ९८५०६५४२५०
e-mail : deodharsunil@rediffmail.com

अविनाश दिवाकर देवधर (स्वीकृत) (कु. वृ. पान. ९६७)
२, लक्ष्मी विनायक सोसा., मंजुनाथ शाळेशेजारील गल्ली, पाथर्ली,
डोंबिवली (पूर्व) दूरध्वनी ०२५१-२४४५२६२
मोबाइल : ९३२२१८९९८७
e-mail : avinash.deodhar@gmail.com

रविश देवधर (स्वीकृत) (कु. वृ. पान. २०२)
ब्लॉक नं. २, आर्य अपार्ट., तळमजला, रावतळे,
मुलींच्या वसतीगृहाच्या मागे, पोस्ट - रावतळे, चिपळूण,
रत्नागिरी-४१५६०५ दूरध्वनी : ९४२१८९४३५०

**विशेष निमंत्रित**
रवींद्र प्रभाकर देवधर (कु. वृ. पान. २०८)
एच १०३, इंटरनिटी को.हौ.सो. इंटरनिटी मॉल शेजारी, तीन हात
नाका, ठाणे (प.) ४००६०४ मोबाइल :९८२०२८४१८३
e-mail : ravi_deo@hotmail.com

**पदसिद्ध सभासद**
नारायण(दिलीप)गोविंद देवधर (कु.वृ.पान ४१८)
बी-१०३ RNA हाईटस्, जोगेश्वरी-विक्रोळी जोड मार्ग
(लिंक रोड),अंधेरी, मुंबई-४०००९३.
दूरध्वनी: ०२२/२८२५२१४५ मोबाईल : ९८१९९७२५११
e-mail : deodhardilip@yahoo.com

**मानद लेखा परीक्षक**
किरण अनंत देवधर (कु. वृ. पान. १६२)
१०, वेदवती सोसायटी, स्वामी विवेकानंद मार्ग,
संजीवन हॉस्पिटलसमोर, अंधेरी (पूर्व) मोबाइल :९८२०३३५०९३

मंडळाची वार्षिक सभा व स्नेहसंमेलन सी. के. पी. हॉल ठाणे येथे संपन्न झाले.
त्यावेळची काही क्षणचित्रे कुलबंधु-भगिनींसाठी देत आहोत.



स्वागतगीत व केशवराजाची आरती सादर करताना कुलभगिनी



कृपया आधी येथे नावनोंदणी करावी



उपाध्यक्ष – सुरेश देवधर



अध्यक्ष पु. गो. देवधर



संमेलनाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. ललिता शरद देवधर

मंडळाच्या सदस्यांच्या कलागुणांचे दर्शन



कु पूर्णिमा देवधर



उपाध्यक्ष श्री. वा. ना. देवधर



श्री. महेश देवधर



अमृतमहोत्सवी सत्कार



विशेष उल्लेखनीय सत्कार

डॉ. सुनिल देवधर

मंडळाचे लेखापरीक्षक
श्री. किरण देवधर



कार्यक्रमास उपस्थित कुलबंधु-भगिनी

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण-४२१३०१ येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण. पीन-४२१३०१ येथे प्रसिध्द केले फोन : (द्वारा) २२०६७३५

## अध्यक्षांचे मनोगत :-

*मनुष्यप्राण्याची जन्मल्यापासून सर्व धडपड ही सुखाने जगण्यासाठी असते. भौतिक प्रगतीने सूख मिळेल अशी अपेक्षा असते.*

*भौतिक प्रगती जरी माणसाचे श्रम कमी करते तरी त्याने त्याला सूख मिळेल याची शाश्वती नाही. वीज आली, बटण दाबतांच उजेड, हवा, गरम पाणी, थंड हवा, दूरदर्शन अगदी सर्व उपलब्ध. आता हात पंखा नको, कंदील नको, पाटा वरवंटा नको, उखळ नको, दळणाचे जाते नको. विहिरीचे पाणी काढणे नको, नळ उघडताच पाणी. ह्या सोयींवर आता आपण अवलंबून असतो. त्या बिघडण्याल्या कि हैराण, चिंता, शारीरिक व मानसिक ताण.*

*ग्रामोफोन जाऊन सी.डी. प्लेअर आला व एका क्षणांत हव्या त्या गायकाचे गाणे ऐका. आता ग्रामोफोन, देवाच्या मूर्ती, रांजण, बंब या शोभेच्या वस्तू झाल्या.*

*बॉक्स कॅमेरा, बल्बचे फ्लॅश, डायल फिरवण्याचे फोन आता कालबाह्य झाले. आता मोबाईल फोन, त्यात मागे व पुढे कॅमेरा, सेल्फी फोटो काढून काही क्षणांत दुसरीकडे पाठवता येतो. त्याची छबी पण आता लगेच काढता येणार आहे. हवा तो संदर्भ पाहण्यास शेकडो फायली व रजिस्टर्स मागेपुढे पाहाणे नाही. आता कॉम्प्यूटरवर 'सर्च' दिला की काही क्षणांत माहिती हजर.*

*आता मुलाची स्वतःची जागा असल्याशिवाय मुली लग्नास तयार होत नाहीत. राजा-राणीचा संसार हवा. ''प्रायव्हसी'' हवी. सर्व सोयींनी युक्त घर असावे.माझ्या मनाप्रमाणे राहता यावे. कोणतेही बंधन नको. घरांची मागणी वाढली. बिल्डर श्रीमंत झाले, आपण कर्जबाजारी.*

*अपत्य संभवाचा आनंद अनेक प्रश्न निर्माण करतो. रजा, घर चालविणे, स्वयंपाक, मुलांचे व स्वतःचे आजारपण, औषधपाणी, सुश्रुषा, नोकरांवर विसंबून राहणे, मग त्यांच्या रजा, आपली ऑफिसला दांडी वगैरे.*

*एकत्र कुटुंब पध्दतीत या सर्व चिंता नसायच्या. सर्व काही घरचे लोक पाहात. आल्या-गेल्याचे स्वागत, मुलांचे पालन-पोषण व संस्कार, शाळेत सोडणे, आणणे, हे सर्व आपोआप होत असे.*

*तलवारी, धनुष्यबाण जाऊन बंदुका, मशीनगन आल्या, तोफा जाऊन रणगाडे आले, पंख्याची विमाने जाऊन बोईंग व सुपरसॉनिक आले, आकाशातील तारे ग्रह न ओळखता चंद्र व मंगळावर स्वारी झागी तरी पत्रिकेतील राहूकेतू व मंगळ, शनी त्रास देतातच. प्रगती भौतिक झाली, वैचारिक नाही. गरजा वाढवायच्या व त्या भागविण्यासाठी भागंभाग, उर फुटेपर्यंत धावायचे, दिवसाची रात्र व रात्रीचा दिवस करावयाचे, मुलांना वेळ देता येत नाही. त्यांचे रुसवे फुगवे काढता येत नाहीत. मग त्यांचे प्रेम मिळत नाही. ''जन्म दिलात म्हणजे उपकार नाही केलेत, आम्हास दुःखात टाकलेत'' असे म्हणण्याची मुलांची तयारी आहे.*

*आपण समाजाचे देणे लागतो. समाजामुळे आपण आहोत. आपण निरपेक्ष भावनेने समाजासाठी काय करतो? ही विचार करण्याची गोष्ट. स्वत:पुरते पशू-पक्षी सुध्दा जगत असतात. आपण माणूस होऊन काय करतो? त्यांचा जगण्याचा हक्क हिरावून घेतो. कोणी हा अधिकार दिला? उपभोगात प्रगती/आनंद नाही तर, त्या गात दुसऱ्यांना आनंद देण्यांत आहे. मंडळ गरजू विद्यार्थ्यांस मदत करून खारीचा वाटा उचलत आहे.*

- पु. गो. देवधर

***

# ठाणे येथे संपन्न झालेले २०१४ चे वार्षिक संमेलन

– सौ. सरिता मुकुंद देवधर,
कार्यवाह

देवधर मंडळाची ३८ वी वार्षिक सभा आणि २०१४ सालचे स्नेहसंमेलन असे दोन्ही कार्यक्रम रविवार दिनांक २ नोव्हेंबर २०१४ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.०० या वेळात सी. के. पी. हॉल खारकर आळी, ठाणे (प.) येथे अतिशय खेळीमेळीच्या आणि उत्साही वातावरणात पार पडले.

या संमलेनासाठी मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, बदलापूर, कल्याण, डोंबिवली अशा विविध ठिकाणाहून एकंदर ११५ कुलबंधु-भगिनी आले होते. बडोद्याहून एक कुटुंब खास संमेलनासाठी आले होते ही विशेष नमूद करण्यासारखी बाब वाटते.

प्रवेशद्वारावरची रांगोळी सर्वांचे स्वागतास हजर होती. सुवासिनींना हळदकुंकू व अत्तर लावून तर पुरुषमंडळींना गंधाचा टिळा व अत्तर लावून सर्वांचे सुगंधीत स्वागत करण्यात येत होते. नावनोंदणी करून झाल्यावर ''नाष्टा करून घ्या'' अशी नम्र सूचना कार्यकर्ते करीत होते.

या संमेलनासाठी प्रमुख अतिथी म्हणून ठाण्यातील प्रसिद्ध देवधर हॉस्पिटलच्या डॉ. ललिता शरद देवधर आल्या होत्या.

संमेलनाचे सूत्रसंचालन करणारे श्री. ओंकार देवधर व सौ. सोनाली देवधर यांनी प्रथम सर्वांचे मन:पूर्वक स्वागत केले.

प्रमुख अतिथी डॉ. ललिता देवधर यांचे हस्ते केशवराज प्रतिमापूजन व दीप प्रज्ज्वलन झाल्यावर संमेलनास सुरुवात झाली.

त्यानंतर मंडळाच्या कार्यवाह सौ. सरिता देवधर यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. ललिता देवधर यांचा परिचय करून दिला. विद्यार्थीदशेपासूनच अत्यंत हुशार असे हे व्यक्तिमत्व आहे. सिल्व्हर मेडलसह एम्. बी. बी. एस् आणि गोल्ड मेडलसह एम्. डी. ही पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. आपले पती, सुप्रसिद्ध जनरल सर्जन डॉ. शरद देवधर यांच्या

## तीळगूळ संमेलन

### मुंबई विभाग

मुंबई विभागाचे यंदाचे तीळगूळ संमेलन रविवार दिनांक १ फेब्रुवारी २०१५ रोजी कानविंदे सभागृह, पेंडसेनगर, डोंबिवली (पूर्व) येथे आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ५.०० ते ७.०० या कालावधीत हा समारंभ होणार असून कार्यकारिणी सदस्य श्री. अविनाश देवधर यांचे 'आयुर्वेद आणि आपण' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

### पुणे विभाग

पुणे विभागाचे यंदाचे तीळगूळ संमेलन रविवार दिनांक १८ जानेवारी २०१५ रोजी राहूलनगर, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ४.३० ते ६.३० या कालावधीत हा समारंभ होणार असून पुणे आकाशवाणीवरील केंद्राचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनिल देवधर हे कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सर्व कुलबंधु-भगिनींनी तीळगूळ समारंभास अगत्य यावे
अशी विनंती देवधर मंडळातर्फे करीत आहोत. - अध्यक्ष

साहाय्याने ठाणे येथे त्यांनी देवधर हॉस्पिटलची स्थापना केली. स्वत:ला व हॉस्पिटलला अपडेट ठेवण्यासाठी अनेक सेमिनार्स, कॉन्फरन्स आणि वर्कशॉपमध्ये त्यांचा नेहमीच सहभाग असतो. स्वत:च्या विषयाशी संबंधीत अनेक नामवंत संस्थाचे सदस्यत्व त्यांनी घेतले आहे. दूरदर्शनच्या विविध वाहिन्यांच्या कार्यक्रमात त्यांचा नेहमी सहभाग असतो. वृत्तपत्र लेखन, चित्रकला, संगीत, वाचन याची आवड असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व आहे.

परिचयानंतर अध्यक्ष श्री पुरुषोत्तम देवधर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. ॲड. सुवर्णा देवधर यांनी मंडळातर्फे साडी व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. त्यानंतर संमेलनानिमित्त तयार केलेल्या 'स्नेहस्पंदन' या स्मरणिकेचे त्यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी स्मरणिकेचे वाटप केले.

त्यानंतर सुरू झाला ७५ वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तिंचा अमृतमहोत्सवी सत्कार समारंभ. सौ. सोनालीने उपस्थित असलेल्या सत्कारमूर्तींची नावे वाचली व त्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या मानपत्राचे वाचन केले. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मानपत्र, पुष्प, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सौ. माधुरी रघुनाथ गोखले, आशा ज. भातखंडे, पद्मा बाळकृष्ण वर्तक, बाळकृष्ण रामचंद्र देवधर, प्रणय काशिनाथ देवधर, नीला रघुनाथ दातार, कमल जयंत जोशी यांचा अमृत महोत्सवी सत्कार करण्याचे भाग्य मंडळाला मिळाले त्याबद्दल मनापासून आनंद वाटतो.

त्यानंतर ज्यांच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत अशा दोन दांपत्यांचे सत्कार करण्यात आले. त्यांची नावे सोनालीने वाचून दाखविली तसेच त्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या शुभेच्छापत्राचे वाचन केले.

श्री. बाळकृष्ण रामचंद्र देवधर हे सहकुटुंब, सहपरिवार बडोद्याहून खास आले होते. विवाहास पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल उभयतांचा पुष्पगुच्छ, शुभेच्छापत्र, श्रीफळ देऊन, अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच श्री. प्रणय काशिनाथ देवधर यांचाही सपत्निक सत्कार करण्यात आला.

त्यानंतर डॉ. सुनिल गोपाळ देवधर, नाशिक यांचा पी. एच्. डी. मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच आपले मानद लेखापरीक्षक श्री. किरण देवधर, विलेपार्ले यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. 'वाटचाल' या आपल्या मंडळाच्या मुखपत्रासाठी भरीव अर्थसाहाय्य केले आहे.

प्रमुख पाहुण्या डॉ. ललिता देवधर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. '' परिवारातील माणसं जेवढा नि:स्वार्थी सल्ला देतात तेवढा कुणीही नाही त्यामुळे आपली माणसे जपणे हे महत्वाचे आहे'' असे मत त्यांनी व्यक्त केले. वैद्यकीय क्षेत्रातील आपले अनुभव कथन करताना त्या म्हणाल्या, ''कोणतेही काम करताना त्यात व्यावसायिक हेतू ठेवू नका, तो प्रामाणिकपणे करा.'' हे सांगताना त्यांनी आपल्या पतीचा अगदी सुरुवातीच्या काळातील एक अनुभव सांगितला - ''एका पेशंटचे ॲपेंडिक्सचे ऑपरेशन करण्यासाठी ते पनवेल येथे गेले होते. पेशंट तपासल्यावर त्यांचे ऑपरेशन करण्याची गरज नाही, केवळ औषधाने आजार बरा होईल असे सांगितले आणि तसे झालेही. सध्या डॉक्टरी व्यवसायाचे जे व्यापारीकरण झाले आहे, त्या पार्श्वभूमीवर हा वेगळा अनुभव व्यवसायाचे उदात्तीकरण करणारा आहे. तेव्हा आपल्या व्यवसायात प्रामाणिकपणा, सचोटी आवश्यक आहे. तो धंदा म्हणून न करता आपण समाजाची सेवा करीत आहोत या भावनेतून करावा.''

असाच आणखी एक अनुभव त्यांनी सांगितला. त्या म्हणाल्या, ''पतीबरोबर चेन्नई येथे गेले होते. त्यावेळी अचानक त्यांचे ऑपरेशन करण्याची वेळ आली. जास्त रक्ताची गरज आहे

तेव्हा ऑपरेशनपूर्वी त्याची व्यवस्था करा असे तेथे सांगण्यात आले. अपरिचित ठिकाणी हे जमावे कसे या विवंचनेत असताना तेथील बँकेत एक परिचित अचानक भेटले. त्यांनी त्यांच्या ओळखीतून ती व्यवस्था केली. आपण जर दुसऱ्याला नि:स्वार्थीपणे मदत केली असेल, तर आपल्या संकटकाळी आपल्याला मदत करण्यास कोणीतरी नक्की पुढे येते. हा अनुभव खूप शिकवून जाणारा होता. आपल्या देवधर मंडळींमध्ये ही वृत्ती आहे ही अभिमानाची गोष्ट आहे.'' त्यांनी आपल्या पुतण्याचे उदाहरण दिले - ''एका कंपनीचे कॉम्प्युटर दुरुस्तीचे काम होते. पुतण्याने दहा हजार रुपयांचे कोटेशन दिले. पण प्रत्यक्ष कॉम्प्युटर दुरुस्तीचे काम पंधराशे रुपयांमध्ये झाले. त्याने तेवढेच बिल दिले. ज्यांनी हे काम दिले होते त्यांनी बोलावून याबाबत विचारणा केली. हा म्हणाला की जेवढा खर्च झाला त्याचे बिल दिले आहे मला जास्त पैसे नकोत. व्यवसायातील प्रामाणिकपणाचा उत्तम दाखला याहून दुसरा कोणताच नसेल.''

अत्यंत ओघवत्या भाषेत, प्रेरणादायी, मार्गदर्शनपर, अनुभवसंपन्न असे त्यांचे मनोगत होते. कष्टाळूपणा, मेहनत, सचोटी, व्यवसायातील प्रामाणिकपणा, दुसऱ्यांप्रती चांगली वर्तणूक या गोष्टींमुळे आयुष्यात आपण यशस्वी होतो हाच संदेश यातून मिळतो. सर्व उपस्थितांनी त्यांच्या मनोगताला भरभरून दाद दिली.

यानंतर माननीय अध्यक्षांनी आपले विचार मनोगतातून मांडले. ते म्हणाले की, ''आयुष्यामध्ये आणि समाजकार्य करताना असे अनेक क्षण येतात कि, माणसाला नैराश्य येते. परंतु ते झटकून टाकून निरपेक्ष बुद्धीने काम करीत राहणे आवश्यक असते. स्वामी समर्थांचे वाक्य नेहमी लक्षात ठेवावे - भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे. यश आणि अपयश याची चिंता न करता, काम करीत राहणे आवश्यक असते. त्यामुळे आपण लोकांना हवेसे वाटतो. आपल्या स्वत:साठी जगण्याचे काहीच ध्येय उरले नसेल तर लोकांसाठी लोकपयोगी कामे करून जीवन व्यतित करावे. आपण लोकांना भारभूत न होता, आधारभूत व्हावे.''

''आपल्या कुलवृत्तांताचे नूतनीकरण हे एक मोठे काम आहे. या कार्यात सर्वांनी हातभार लावावा.'' असे आग्रहपूर्व निवेदन करून ते म्हणाले कि, ''आपले एक कार्यकारिणी सदस्य श्री नरेश कृ. दीक्षित यांनी सर्व माहिती संकलित करण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. आपण सर्वांनीच त्यांना सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.''

नंतर डॉ. सुनिल देवधर यांनी आपले मनोगत मांडले व त्यात संमेलनास उपस्थिती कमी असल्याबद्दल खंत व्यक्त केली. श्री. नरेश दीक्षित यांनी कुलवृत्तांतासाठी अद्ययावत फॉर्म भरून द्यावेत असे सर्वांना सांगितले.

संगीताच्या कार्यक्रमात कु. पुर्णिमा देवधर (ठाणे) हिने आपल्या सुरेल आवाजात एक गीत सादर केले. कोणतीही साथसंगत नसताना तीने म्हटलेले गाणे सगळ्यांना खूप आवडले. मंडळाचे उपाध्यक्ष श्री . वा. ना. देवधर यांनीही एक गीत सादर केले. या वयातही त्यांचे संगीत शिक्षण सुरू आहे. श्री. महेश देवधर (ठाणे) यांनी त्यांच्या जीवनात त्यांना भेटलेल्या समाजातील मान्यवर व्यक्तिंबाबत आपले अनुभव सांगितले व स्वरचित गीते सादर केली.

ठाण्यातील ज्या सभासदांनी हे संमेलन यशस्वी करण्यासाठी अपार मेहनत घेतली, ते श्री. विजय देवधर, ॲड. सुवर्णा देवधर, पंडीत पुरुषोत्तम देवधर, त्यांची कन्या कु. पुर्णिमा, ओंकार व सौ. सोनाली देवधर, ऋषिकेश देवधर, महेश देवधर व त्यांची पत्नी यांचा सत्कार व कौतुक मा. अध्यक्ष व प्रमुख अतिथींच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

......... पान ६ वर)

# Armed Forces Medical College **एक उत्तम पर्याय**

**– विनायक देवधर**, पुणे

रविवार २ नोहेंबर २०१४ रोजी ठाणे येथे ''देवधर मंडळाच्या'' वार्षिक स्नेहसंमेलनात माझा सत्कार केल्याबद्दल मी देवधर मंडळाचा आभारी आहे. हा सत्कार माझ्या वतीने माझे आजोबा श्री. मधुसूधन देवधर यांनी स्वीकारला. सत्काराची पूर्वसूचना मिळाली असती तर कदाचित मी स्वतः उपस्थित राहिलो असतो. (वसतीगृहात राहात असल्याने बाहेरगावी जाण्यास पूर्व परवानगी घ्यावी लागते.) १० वी च्या परीक्षेतील यशाबद्दलही देवधर मंडळाने माझा सत्कार केला होता. असो...

नातेवाईक व ओळखीच्या बऱ्याच जणांनी मला तू AFMC (Armed Forces Medical College) मधे जाणे का पसंत केलेस असा प्रश्न विचारला. (AFMC मधे आर्मीची कडक शिस्त असते. बाँड घ्यावा लागतो वगैरे वगैरे ) अगदी खरे व मनातले सांगावयाचे झाले तर एकदा Medical ला जायचे हा निर्णय घेतल्यावर सर्व दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक असते. ॲडमिशन कोठे मिळेल हे आधी सांगता येत नाही/ठरविता येत नाही. वेगवेगळ्या अनेक स्पर्धा परीक्षा असतात. त्यापैकी जास्तीतजास्त परीक्षांना बसण्याचा निर्णय मी आधीच घेतला होता. खालील परीक्षा मी दिल्या 1) MHCMT 2) AIPMT 3) NGIMS Wardha 4) Kasturba Medical, Manipal 5) AIIMS 6) Krishna Inst. Med. Science, Karad 7) JEE (Mains) 8) KIT, Bhubaneshwar. In a competitive examination what others perform is more important than what you perform. कारण एका मार्कानि ही तुमचा Merit list मधला क्रमांक बराच खाली वरती जाऊ शकतो.

मी १२ वी PCB बरोबर M (Maths) विषयही घेतला असल्याने JEE Mains परीक्षेलाही बसलो (निव्वळ परीक्षेच्या सरावासाठी) व JEE Advance साठी Qualify ही झालो पण JEE Advance दिली नाही कारण IIT ला जायचेच नव्हते. (JEE Mains च्या निकालावर महाराष्ट्रातल्या चांगल्या Engineerin College मधे प्रवेश मिळून गेला असता) वर्धा, मणिपाल, कराड KIT भुवनेश्वर येथील Interview साठी बोलावणे येऊनही मी गेले नाही. महाराष्ट्रातील Medical College च्या परीक्षेचा निकाल लागून मला लोकमान्य टिळक मेडिकल कॉलेज, मुंबई येथे प्रवेश मिळाला व फी भरून प्रवेश घेतला. त्यानंतर AFMC चा निकाल लागून Interview साठी बोलावले व त्यात उत्तीर्ण होऊन प्रवेश नक्की झाला. मी दोन्हीपैकी AFMC ची निवड केली. AFMC मधे प्रवेश घेण्याची मुख्य कारणे अशी-

१) AFMC मधे ''अभ्यास एके अभ्यास '' नसून Personality Development कडेही लक्ष दिले जाते.

२) ''शिक्षणाचा दर्जा '' ह्या निकषावर AFMC ला बरेच वरचे स्थान आहे.(काही सर्व्हेप्रमाणे AFMC देशातील पहिल्या पाचामधे आहे.)

३) मधल्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेतून होतात. व देशातील सर्व प्रांतातील विद्यार्थी येथे येतात.

४) आर्मीमधे नोकरी करण्याचे ठरविल्यास तीही एक देशसेवाच आहे.

माझ्याकडे काही जणांनी विचारणा केल्याने असे लक्षात आले की बऱ्याच जणांचे AFMC बद्दल गैरसमज आहेत. एक आर्मीची कडक शिस्त पाळावी लागते, बाँड द्यावा लागतो वगैरे. प्रत्यक्षात येथे

थोडीफार शिस्त आहे पण ती बरीचशी पहिल्या टर्मपुरती मर्यादित आहे. साडेचार वर्षानंतर सेनेत नोकरी करावयाची नसेल तर पैसे भरून मुक्त होता येते. येथे असलेली शिस्त आपल्या personality development साठी आवश्यक आहे असे मला तरी वाटते.

AFMC मधे हॉस्टेलमधेच राहावे लागते. इथली फी भरण्याचे वेळी लक्षात आले की hostel, mess, college fees वगैरे महाराष्ट्रातल्या सरकारी कॉलेजेसच्या मानाने खूपच कमी आहेत. त्यामुळे साडेचार वर्षात वाचलेले पैसे पाहता बाँडचे पैसे भरले तरी nett भरावे लागणारे पैसे फार नाहीत.

माझ्या ह्या वर्षाच्या १३० मुलांच्या बॅचमधे 'मराठी' आम्ही दोघेच आहोत. सबंध कॉलेजमधे (सर्व टर्मस् मिळून) चार-पाच जणच मराठी आहेत. (त्यातील दोन तर नावाने मराठी असले तरी त्यांच्या ॲडमिशन्स दुसऱ्या प्रांतातून झाल्या आहेत असे समजते.)

मराठी मुलांनी AFMC मधे येण्याचा अवश्य विचार करावा त्यासाठी मी माझा अनुभव व माहिती इतरांशी share करायला तयार आहे.

- विनायक देवधर, पुणे
०९७६४७११८७४
vinayak.deodhar96@gmail.com

## सुनिल देवधर यांचा माहितीपट सर्वोत्कृष्ठ

नवी दिल्लीतील आकाशवाणी महानिदेशालयाच्या सर्वोत्कृष्ठ माहितीपट श्रेणीत पुणे आकाशवाणीवरील केंद्राचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनिल देवधर यांच्या 'अभी अभी तो आया वसंत' या रेडिओ माहितीपटाने बाजी मारली. संकल्पना डॉ. देवधर यांची आहे.

(दै. सकाळ मधून साभार)

....पान ४ वरून)

श्री. रवींद्र देवधर यांचाही त्यांच्या अनुपस्थितीत विशेष उल्लेख करण्यात आला. संमेलनाचे स्थळ ठरविण्यापासून त्यांचा यात सहभाग होता. त्यादिवशी शरीराने नाही तरी मनाने ते उपस्थित होते. व्हॉट्स ॲप वर संमेलनाच्या तयारीबाबत ते वारंवार चौकशी करीत होते व त्यांनी शुभच्छाही दिल्या होत्या.

त्यानंतर कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांनी आपली ओळख करून दिली. माजी अध्यक्ष श्री. नारायण (दिलिप) गोविंद देवधर यांचा सत्कार करण्यात आला.

पसायदानाने संमेलनाची सांगता झाली.

भोजनाचा आस्वाद घेऊन, पुढल्या वर्षी मोठ्या संख्येने भेटू असे एकमेकांना बजावत सर्व मार्गस्थ झाले.

***

आपला किंवा आपल्या नातेवाईकांचा, ओळखीच्या कुलबंधू-भगिनींचा पत्ता बदलला असेल तर तो वाटचालकडे जरूर पाठवावा. अपुरा पत्ता अथवा पत्ता सापडत नाही असा शिक्का मारून पोष्टातून परत आलेल्या नावावरील अंक पाठविणे बंद केले जाते.

कृपया पत्ता बदलल्याचे कार्यकारिणी सदस्य श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित यांचेकडे कळवून मंडळास सहकार्य करावे. त्यांचा पत्ता कार्यकारिणीच्या यादी ज्या पानावर छापली आहे त्यावर आहेच.

अंक पाठविणे थांबविण्यापेक्षा तो योग्य हाती पोहोचविण्यात मंडळास जास्त आनंद वाटतो.

धन्यवाद!

-संपादक

# मऱ्हाठमोळं जेवण दुबईत नेणारा देवधर

**– सुधीर गाडगीळ**, पुणे

*अस्सल मराठी जेवण ग्लोबलाईज करण्याचा चंग बांधलेला पुण्याचा सचिन देवधर. पुण्यातल्या डेक्कन जिमखान्यावर, गरवारे पुलापासल्या माडीवर, जनसेवा भोजनालयाचा देवधरांचा पिढीजात व्यवसाय सांभाळता सांभाळता, आता सचिनने दुबईत 'पेशवा' सुरू करून उकड, कडबू असे घरेलू मराठी पदार्थ खिलवायला सुरू करून, मराठी थाळीचा टिफिन चक्क दुबईत द्यायला सुरुवात केली आहे. खाण्याच्या क्षेत्रातल्या त्याच्या दुबईतील खाद्यसेवेची ही कहाणी.*

कधी शॉर्ट आणि टी शर्ट, कधी साधासा बुराकोट-पँट, काहीसा घामेजलेला चेहरा, हातात तांबडा-काळा गंडा, पण केव्हाही पाहा सतत हसतमुख. उद्योगाच्या नवनवीन संकल्पना भरभरून सांगायला उत्सुक. एका वेळी अनेक कामे अंगावर घेण्याच्या उत्साहामुळे किंवा कुणालाही न दुखावण्याच्या स्वभावामुळे, कुणा-कुणाच्या जबाबदाऱ्या हौसेनं उचलल्यामुळे, नकळत वेळा पाळण्याचा काहिसा गोंधळ उडलेला असा आमचा लव्हेबल तरूण मित्र सचिन देवधर.

केमिस्ट्रीत बी. एस्. सी. केलं, मॅनेजमेंटचा डिप्लोमा केला. अमेरिकेत वाढलेल्या मूळ पुण्याच्या आठवलेच्या प्रेमात पडून लग्नही केलं. 'घर' उद्योगाच्या परंपरेतील असल्यानं हासुद्धा 'पंचाहत्तरी' ओलांडलेल्या जनसेवा भोजनालयाच्या सेवेत आला. कॉन्ट्रॅक्टिंग फर्निचर, पेंटींगमध्ये लक्ष घालू लागला. सिम्बॉयसीस, कॉसमोसचं इंटिरियरचं माफक कंत्राटही घेऊ लागला.

मधल्या टप्प्यावर वडलांचं म्हणजे रामभाऊंचं त्यांच्या पन्नाशीलाच निधन झालं. हा तेव्हा विशित होता. पण अल्पवयात घरची व्यवसायाची जबाबदारी थोडी वाढली. पण सचिनच्या मते आम्ही 'सारे देवधर कुटुंबिय' एकसाथीनं जबाबदारी उचलतो, निभावतो. त्यामुळेच परस्पर नातेसंबंध आणि वाढता व्यवसाय टिकून आहे. सचिन म्हणतो कि, शरद पवारांमुळे बालेवाडीचे अधिकृत कॅटरर झालो. त्यामुळे 'मेहफिल' नावानं केटरिंग उद्योग स्वतंत्र सुरू करू शकलो. २००० साली जनसेवा भोजनालयाचं खानावळीचं स्वरूप बदलून डायनिंग हॉलचा चेहरा आणला आणि अलिकडे हर्ष हॉलची जेवणाची जबाबदारी घ्यायला सुरुवात केली.

देवधरांकडे बाळ उर्फ डेबू नावानं सिनेसृष्टीत परिचित असलेला एक कॅमेरामन होता. या बाळकाकामुळे सचिनचं सिनेमावाल्यांशी सूत जुळलं आणि मनस्वी स्वभावामुळे सिनेमासह सर्वच क्षेत्रातील माणसं तो जोडत गेला.

तारे जमीं पर, विरुद्ध, जोधा अकबर असे ठळक हिंदी चित्रपट आणि असंख्य मराठी चित्रपटांच्या चित्रिकरण काळात आउटडोअर कॅटरिंग त्याने सुरू केलं. नाना पाटेकर हा तर डेबूमुळं घरातलाच झालेला होता. आमीर खान, शाहरुख खान यांना खिलविण्याची संधी या शुटींगमुळे मिळाली. त्याच्यामते चोवीस तान नॉर्मल वागणारा कलावंत म्हणजे आमीर खान. त्याला वडापाव खूप आवडतो, आणि जेवताना तांबडा-पांढरा रस्सा मस्ट. सचिनने शाहरुख खानला उकडीचे मोदकही खिलवले आहेत. आशुतोषच्या पिक्चरचं केटरिंगचं काम करताना त्याला सर्वाधिक आनंद मिळालाय.

आपलं परदेशात रेस्टॉरंट असावं आणि सारे मराठी पदार्थ मिळावेत ही सचिनची मनापासून इच्छा होती. दुबईत राहणाऱ्या दुसऱ्या सचिनशी

(जोशी) ओळख आनंद जोगने (दरोडे-जोग कन्स्ट्रक्शन) करून दिली. आईनं म्हणजे उज्ज्वलाताईंनी स्वयंपाकी प्रशिक्षित केले. मेनू ठरविण्यात मार्गदर्शन केलं आणि मग सचिन देवधरनं स्वत: पूर्ण अभ्यास करून, नागपुरी, कोल्हापुरी, पुणेरी, मालवणी असं सर्व छटांचं महाराष्ट्रीयन खाणं 'पेशवा' माध्यमातून द्यायला सुरुवात केली. पेशव्याचं मेनूकार्डच तेरा पानी आहे.

कैरीचं पन्हं, बटाटा पोहे, सिंहगड भजी असे स्नॅक्स आणि भरली वांगी, कार्ली-बिरड्याची उसळ, फणसाची भाजी, पुणेरी आमटी, फोडणीचा भात, पुरणपोळी, उकडीचे मोदक अशा मराठी पदार्थांनी मेनूकार्ड फुलले. सचिन जोशी आणि ऋषिकेश व सचिन देवधर यांनी केवळ परदेशात दुर्मीळ असलेल्या मऱ्हाठी पदार्थांची 'चव'च पुरवली असं नव्हे तर चांदीच्या ताटात मराठी जेवण देण्याची हौसही पुरविली. दुबईच्या जोडीला शारजा मध्येही रेस्टॉरंट सुरू केलय. ऑस्ट्रेलियामध्येही 'पेशवा'ची शाखा उघडण्याचं सचिनच्या मनात आहे. 'एन.आर.आय' मराठी मुलांना आपलं कल्चर माहीत व्हावं म्हणून खाण्याच्या जोडीला त्यांनी वाचनालयही पेशवात सुरू केलं आहे. अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाची जबाबदारीही (स्वभावानुसार) उचलण्यास सचिनने आरंभ केला आहे.

'पेशवा'मध्ये जेवणाच्या हॉलच्या भिंतीवर विश्रामबागवाडा, पर्वती, सिंहगड अशी पुण्याची आठवण देणारी अप्रतिम चित्र लावली आहेत.

सचिनला खाणं-गाणं परदेशात सादर करताना मूळ आतून मनातून सतत म्हणायचंय कि, मराठी माणूस म्हणजे गरीब बिचारा ही समजूत मनातूनच काढून टाका. लक्षात ठेवा मराठी माणसाच्या मनगटात अटकेपार झेंडा फडकविण्याचं कर्तृत्व आहे. त्यामुळे त्याने गतवर्षीपासून दुबईत कर्तृत्वानं मोठ्ठ झालेल्या मराठी माणसाला पेशवा पुरस्कारानं गौरविण्यास सुरुवात केली आहे.

तीनशे पन्नास दीराम मध्ये बायपास करणारे, दीड हजार रुग्णांवर अल्पदरात उपचार करणारे डॉ. पैठणकर यांना गतवर्षी नाना पाटेकरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यंदा हा मान कडवे सरांना मिळाला. प्रमुख पाहुणा होता, सचिन खेडेकर हा अभिनेता.

योगायोगानं यंदा पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या दुबईतल्या पेशवा सोहळ्याला मी स्वत: हजर होतो. कडवे आणि खेडेकर दोघांच्याही मुलाखती मीच घेतल्या. कॅपिटल मार्केट क्षेत्रात स्वत:चा वेगळा ठसा उमटविणारे कडवे सर अनेक चायनीज कंपन्यांवर संचालक आहेत.

'पेशवाई'च्या सोबत मासे-मटणाचे नानाप्रकार खिलवत देशोदेशी 'पेशवा'चा झेंडा मिरवावा यासाठी त्याला शुभेच्छा!

***

## दिलगिरी

सप्टेंबर २०१४ च्या वाटचालच्या अंकात शैक्षणिक मदतीची परतफेड या विषयातील संबंधीत बातमीमध्ये पान १२ वर अनुराधा देवधर, मुंबई यांच्याकडून रु. २१,०००/- शैक्षणिक मदतीची परतफेड असा उल्लेख झाला होता. वस्तुत: श्री. योगेश प्रमोद देवधर, टिळक आळी, रत्नागिरी यांचेकडून ती शैक्षणिक मदतीची परतफेड आली होती.

अनवधानाने झालेल्या चुकीबद्दल दिलगीर आहोत. - आतिथी संपादक

# श्री. सदाशिव गजानन देवधर निवर्तले

– नारायण (दिलिप) गोविंद देवधर, मुंबई
९८१९९७२५११

*मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. सदाशिव गजानन तथा सदुभाऊ देवधर यांचे १३ नोव्हेंबर २०१४ रोजी डोंबिवली येथील राहते घरी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. गेले काही दिवस ते आजारी होते.*

*मंडळाच्या वाढीसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले होते. त्यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीत त्यांनी मंडळ नोंदणीकृत करून घेतले होते. आसूद येथे मंडळाची स्वत:ची वास्तू असावी यासाठीही त्यांनी खूप प्रयत्न केले.*

*त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. श्री. सदुभाऊंच्या कुटुंबियांचे दु:खात देवधर मंडळ सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!* - आतिथी संपादक

देवधर मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. रा. रा. सदाशिव गजानन देवधर यांचे दि.१३/११/२०१४ रोजी दुःखद निधन झाले. ही बातमी कळली आणि अनेक आठवणींचा जागर मनामध्ये झाला. एक हाडाचे व धडाडीचे कार्यकर्ते, पदरमोड करून सामाजिक कार्यात झोकून देणारे, देवधर मंडळाच्या कार्यात तन-मन-धन अर्पण करणारे आमचे 'सदुभाऊ' इहलोकीचे यात्रा संपवून पुढे गेले आहेत.

१९७१ मध्ये माझा देवधर मंडळाशी संपर्क झाला. १९७५ च्या शेवटीशेवटी मी डोंबिवलीत राहायला गेलो, आणि श्री. सदुभाऊंच्या संपर्कात आलो. त्यावेळी त्यांचे बंगले-वजा घर होते. सर्व भावंडे तिथे राहत होती. घराला एक छान मोठी गच्ची होती. देवधर मंडळाच्या संक्रांती समारोहाच्या धर्तीवर एक कार्यक्रम आयोजित करण्याचे त्यांच्या मनाने घेतले. स्थळ अर्थातच सदुभाऊंच्या घराची गच्ची. मग डोंबिवलीतील कलाकारांचा शोध सुरू झाला आणि मग एक सुरेल, सुरेख स्नेहसंमेलन, देवधर-दीक्षित-ढमढेरे मंडळाचे पार पडले. या मागील मुख्य प्रेरणास्थान अर्थातच कै. सदुभाऊ देवधर होते.

त्यानंतर मग देवधर मंडळाच्या माध्यमातून त्यांच्याशी संबंध वारंवार येऊ लागला. डोंबिवलीचा काना-कोपरा त्यांनी त्यावेळी देवधर मंडळाच्या कामाकरिता पिंजून काढला होता. देवधर मंडळाच्या माध्यमातून 'देवधर-दीक्षित-ढमढेर' कुलवृतांताच्या दुसऱ्या आवृत्तीचे काम सुरू झाले होते. त्यातही त्यांनी हिरीरीने भाग घेतला.

१९९० च्या सुरुवातीला माझी बदली उत्तरप्रदेशातील कानपूर येथे झाल्याने मंडळाच्या कामाला न्याय देणे शक्य नव्हते म्हणून मी मंडळाचे कार्यवाह पद सोडले व माझे जागी श्री. सदाशिव गजानन उर्फ सदुभाऊ देवधर यांची निवड करण्यात आली. अंतिमतः २० ऑक्टोबर १९९२ रोजी देवधर कुलवृत्तांताची दुसरी आवृत्ती प्रसिध्द करण्यात आली तेव्हा श्री. सदुभाऊ देवधर हेच कार्यवाह होते.

देवधर मंडळाची वार्षिक सहल हे त्या काळात एक मोठे आकर्षण होते. त्यात जेव्हा रेल्वे रिझर्वेशनचा प्रसंग यायचा त्यावेळी परत सदुभाऊंचा उपयोग व्हायचा. ते स्वतः रेल्वेत काम करीत असल्याने गृप रिझर्वेशन कसे करायचे याची त्यांना योग्य माहिती होती. त्यामुळे रिझर्वेशनची कधी अडचण भासली नाही. कालांतराने सदुभाऊ मंडळाच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. त्यांच्या कारकिर्दीत देवधर मंडळाचे रजिस्ट्रेशन करण्यात आले. श्री केशवराज देवस्थान, आसूद येथे भक्त निवास बांधण्यासाठीही त्यांनी बरेच प्रयत्न केले.

देवधर मंडळासाठी झोकून देऊन काम करणारे हे प्रेमळ व्यक्तिमत्व आज काळाच्या पडद्याआड गेले आहे. माझी व्यक्तिशः आणि देवधर मंडळातर्फे त्यांना हार्दिक श्रध्दांजली. ***

# कुलवृत्तांताच्या नवीन आवृत्तीसाठी पुरवणी माहिती

(टीप : विवाह झालेल्या मुला/मुलींसाठी वेगळा फॉर्म वापरावा)

मजकूर पाठवितांना तो या क्रमाने येणे अपेक्षित आहे. या फॉर्मची झेरॉक्स काढून त्यावर भरून पाठविणे नाही. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिचा वेगळा फॉर्म पाठवावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कुलवृत्तांत पान नं.<br>घराणे | |
| १) नांव | स्वत:चे | वडिलांचे/पतीचे नांव | आडनांव | |
| माहेरचे नांव (महिलांसाठी) | स्वत:चे | वडिलांचे | आडनांव | |
| २) वडिलांचे नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव | |
| ३) पती/पत्नीचे नांव | नांव | वडिलांचे | आडनांव | |
| ४) पती/पत्नीच्या वडिलांचे | नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव |
| ५) पूर्ण पत्ता : घर नं. | इमारत | रस्ता | | |
| तालुका | जिल्हा | राज्य | | |
| पिन | मोबाईल | | | |
| ६) फोन नं. कार्यालय | | | घर | |
| ७) जन्मदिनांक (........./........../..............) ठिकाण (गांव) | | | शहर | |
| राज्य | | पिन | देश | |
| ८) विवाहाची तारीख (........../.........../...............) | | | | |
| ९) शिक्षण (दहावी / बारावी / पदवी वगैरे) | | | विद्यापीठ | |
| १०) व्यवसाय | | | | |
| ११) काही महत्त्वाच्या उपलब्धी (माहिती सविस्तर लिहावी) | | | | |
| १२) इतर खास लिहिण्यासारखे (माहिती सविस्तर लिहावी) | | | | |
| १३) अपत्य (मुलगा/मुलगी) नांव जन्म दिनांक (........../.........../..............) | | | | |

फॉर्म पाठविण्याचा पत्ता :

श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित

ब/९, ॐ भैरवी सोसायटी, सम्राट हॉटेल बिल्डिंग, पं. दीनदयाळ मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२, जि. ठाणे (महाराष्ट्र) फोन : ०२५१- २४८८७३६ मोबाईल : ९८२०४६७७४२ email : nareshdixit1949@gmail.com